अकोला दिनांक. २२-०५-२०२५

## दरपत्रक प्रसिध्दी

पोलीस अधीक्षक अकोला यांचे आस्थापनेवरील शहर वाहतुक शाखा अंतर्गत अकोला शहर व अकोला जिल्हा ग्रामीण विभागातील पो.स्टे.अंतर्गत गैर कायदेशीररित्या पार्कींग होणाऱ्या दुचाकी वाहनांना उचलुन आणण्याकरीता क्रेन,वाहन एक वर्षाकरीता भाडे तत्वावर घेण्यात येते. सन २०२५-२६ या वर्षाकारीता दरकरार करणे असल्याने इच्छुक निवीदा धारकांनी आपली निवीदा नमूना अ व ब मध्ये दोन वेगवेगळया बंद लिफाफयामध्ये हया कार्यालयास न चुकता सादर करावी. दरपत्रकाचा नमुना अ व ब, तसेच कार्यालयाचे अटी व शर्ती, पोलीस अधीक्षक अकोला यांचे https://akolapolice.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २२.०५.२०२५ रोजी पासुन प्रसिध्द करण्यात येत आहे. निवीदाकारांकरीता दरपत्रके सादर करण्याची अंतिम तारीख ३०-०५-२०२५ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजे पर्यंत आहे. त्या नंतर येणा-या निवीदांचा विचार करण्यात येणार नाही याची सर्व निवीदाकांरांनी नोंद घ्यावी.

**( मा.पो.अ. यांचे मान्यतेने )**

22/05/2025

( आनंद महाजन )
प्र.पोलीस उपअधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला.

प्रति,

प्रभारी पोलीस अधिकारी,
सायबर पोलीस स्टेशन अकोला.

D/Trffic/Toing Van-2025

पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला
टोईंग वाहन व क्रेन भाडे बाबत दराचा लिफाफा
(व्यापारी लिफाफा) नमुना अ

प्रति,
मा.पोलीस अधीक्षक,
अकोला.

विषय :- टोईंग वाहन व क्रेन साहित्य खरेदी
व्यापारी लिफाफा क्रमांक-२

०००

महोदय,

मी श्री .................................................................................संदर्भिय जाहिरातीच्या अनुषंगाने आपले कार्यालयाचे संकेतस्थळावर/नोटीस बोर्डवर प्रसिध्द केलेल्या दरपत्रकातील अटी व शर्तीचे वाचन केले असुन त्यात नमुद केलेल्या अटी व शर्तीशी पुर्णपणे सहमत आहे. मी टोईंग वाहन क्रेन भाडयाने देण्याबाबतचे दर खालील नमुद केल्याप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | कामाचे विवरण | प्रती वाहन उचलणे बाबतचे दर (अंकात आणि अक्षरात) |
|---|---|---|
| ०१ | दुचाकी वाहन उचलण्याकरीता टोईंग वाहन भाडे | |
| ०२ | चारचाकी वाहन उचलण्याकरीता क्रेन भाडे | |

आपला विश्वासु

.................................

.................................

.................................

पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला

टोईंग वाहन व क्रेन भाडे बाबत दराचा लिफाफा

निविदा अर्ज (तांत्रिक लिफाफा) नमुना ब

प्रति,

मा.पोलीस अधीक्षक,

अकोला

विषय :- टोईंग वाहन व क्रेन साहित्य खरेदी

तांत्रिक लिफाफा (Techinical bid) लिफाफा क्रमांक १

०००

महोदय,

मी श्री ..........................................................................................................आपले कार्यालयाचे संकेतस्थळावर/नोटीस बोर्डवर प्रसिध्द केलेल्या जाहिरातीचे अनुषंगाने अटी व शर्तीचे वाचन केले असुन त्यात नमुद केलेल्या अटी व शर्तीशी पुर्णपणे सहमत आहे. मी टोईंग वाहन व क्रेन भाडयससाने देण्याकरीता वापरण्यात येईल त्या वाहनाचे सर्व कागदपत्रे सादर करण्यात येत आहे.

१. दरपत्रक धारकाचे नांव व मोबाईल क्रमांक ..........................................................................

..........................................................................

२.फर्मचे नांव संपुर्ण पत्ता ..........................................................................

..........................................................................

..........................................................................

३.वाहनाचे रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्राची प्रत :- जोडले आहे / नाही

४.टॅक्स प्रमाणपत्राची प्रत :- जोडले आहे / नाही

५.फिटनेस प्रमाणपत्राची प्रत :- जोडले आहे / नाही

६. विमा पियुसी तसेच परमिट सर्टीफीकेट :- जोडले आहे / नाही

७.शर्ती व अटी प्रमाणे पुरविण्यात येणारे वाहने

१० वर्ष नंतरची निर्मीती आहे किंवा नाही :- आहेत / नाहीत

८.इन्कम टॅक्स क्लीअरन्स प्रमाणपत्र :- जोडले आहे / नाही

९. दोन चाकी वाहने उचलण्याकरीता टोईंग वाहने ही :- आहेत / नाहीत

फक्त मेटॅडोर /स्वराज माजदा/ टाटा ४०७/टाटा ७०९

तसेच चारचाकी वाहने उचलण्या करीता क्रेन टाटा/महिंद्रा/

एल ॲड टी / अशोंक लिलॅन्ड कंपनीची आहेत किंवा नाही.

आपला विश्वासु

................................

**पोलीस अधीक्षक अकोला आस्थापनेवरील अवैधरीत्या पार्कींग केलेल्या दुचाकी वाहने उचलण्याकरीता टोईंग व्हॅन चारचाकी वाहने उचलण्याकरीता क्रेन भाडे तत्वावर घेण्याकरीता कार्यालयाचे अटी व शर्ती.**

**सन-२०२५-२०२६**

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| १ | सदरची वाहने हे करार पध्दतीने घेतलेले आहेत ते दररोज सकाळी ०८ ते रात्री. २२ पर्यंत वाहतुक नियंत्रण शाखेमध्ये कर्तव्यास असेल व त्यानंतर तातडीच्या कामाकरीता कार्यालयामध्ये २४ तास राखीव राहील. |
| २ | वाहतुक नियंत्रणाचे कर्तव्याकरीता पोलीस अधिक्षक अकोला यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कोणत्याही वाहतुक विभागामध्ये नेमण्या बाबतचा अधिकार पोलीस अधीक्षक यांना राहील. |
| ३ | कर्तव्यावर असलेल्या वाहनाच्या इंधनाचा खर्च वाहन मालकास (दरपत्रके सादर करणा-यास) करावयाचा आहे |
| ४ | करार करण्यात आलेली वाहने नेहमी सुव्यवस्थेमध्ये राहील याची दक्षता घेण्याची जबाबदारी वाहन संबंधित कंत्राटदाराची असुन मेंटनंन्सचा खर्च वाहन मालकास करावयाचा आहे. त्याकरीता कोणतीही आर्थिक मदत पोलीस अधीक्षक, अकोला यांचे कडुन देण्यात येणार नाही. |
| ५ | करार करण्यात आलेल्या वाहनांची रजिस्टेशन सर्टिफिकेट,टॅक्स सर्टीफीकेट,फिटनेस सर्टीफीकेट,विमा पि.यु.सी.व परमिट सर्टिफिकेट योग्य वेळी नुतनिकरण करुन ते पोलीस अधीक्षक, अकोला यांचेकडे तात्काळ सादर करण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील. यामध्ये हयगय झाल्यास करार रदद करण्याचा अधिकार पोलीस अधीक्षक, अकोला यांनी राखुन ठेवले आहेत. |
| ६ | करार करण्यात आलेली वाहने कर्तव्य कालावधीमध्ये नादुरुस्त झाल्यास त्यामुळे शासकिय कर्तव्यामध्ये अडथळा निर्माण होवु नये याकरीता पोलीस अधीक्षक, अकोला यांचे पुर्व परवानगीने तात्पुरते दुसरे वाहन पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची (वाहन मालकाची) राहील. असे वाहन देतांना सदर वाहनांचे रजिस्टेशन सर्टिफिकेट,टॅक्स सर्टीफीकेट,फिटनेस सर्टीफीकेट,विमा पि.यु.सी.व परमिट योग्य असेल याची खात्री देण्यात येते.तसेच पिकअप चार्जेस करीता वापरण्यात येणा.या पावतीवर तात्पुरत्या बदललेल्या वाहनाचा क्रमांक नोंद करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची (वाहन मालकाची)राहील. |
| ७ | सदर वाहनास दररोज डिझेल कमी पडणार नाही याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील डिझेल कमी पडल्याची तक्रार आल्यास कंत्राटदार जबाबदार पकडण्यात येईल |
| ८ | वाहनावर कर्तव्याकरीता एक चालक,एक फोटोग्राफर व चार कर्मचारी नेमण्यात येतील.त्याचा पगार व भत्ता कंत्राटदार (वाहन मालक) देईल. आवश्यक असलेला डिजीटल कॅमेरा वाहन मालक पुरविल व त्यातील माहिति पोलीस निरीक्षक वाहतुक शाखा अकोला कार्यालयास एकत्रित संकलित करुन नियमीत सादर करील. |
| ९ | वाहनावर कर्तव्याकरीता एक चालक,एक फोटोग्राफर व चार कर्मचारी नेमण्यात येतील.त्याचा पगार व भत्ता कंत्राटदार (वाहन मालक) देईल. आवश्यक असलेला डिजीटल कॅमेरा वाहन मालक पुरविल व त्यातील माहिति पोलीस निरीक्षक वाहतुक शाखा अकोला कार्यालयास एकत्रित संकलित करुन नियमीत सादर करील. |
| १० | वाहनावर कर्मचारी नेमतांना त्यांची पोलीस विभागाकडुन चारीत्र पडताळणी करुन त्याचे अहवाल सादर करुन वाहनावर कर्तव्याकरीता नेमल्यास सदरचा करार हा रदद करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, अकोला यांना राहतील. |
| ११ | वाहन चालकाने वाहन चालविण्याचा मुळ वैध परवाना कर्तव्यावर असतांना स्वत जवळ बाळगने बंधनकारक राहील. |
| १२ | कर्तव्यात असलेल्या वाहनावर नेमण्यात आलेले कर्मचा-याचे केस व्यवस्थीत कापलेले असतील.त्यांनी कर्तव्यावर असतांना दररोज डार्क नेव्ही ब्लु शर्ट व डार्क नेव्ही ब्लु पॅन्ट असा गणवेश परिधान करतील. तसेच त्यांना ओळखपत्रे देण्याबाबतची कार्यवाही करून घेण्यात येईल. |
| १३ | वाहनावर नेमलेल्या कर्मचारी यांच्यावर वाहतुकीचे नियमाचे उल्लंघन करणारी वाहने उचलने या कामाबरोबरच विविध बंदोबस्ताचे वेळी बॅरिकेटींग अगर वाहतुक नियमांनकरीता आवश्यक असलेली साधने उचलने,पोहचविणे व ठेवणे ही कामे करणे बंधनकारक आहे. |
| १४ | वाहनावर कर्तव्याकरीता नेमलेल्या कर्मचा-यांनी वाहने उचलण्याची कामकाज वाहनावर कर्तव्यात नेमलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या निर्देशानुसार करतील. वाहनामधील कर्मचारी हे वाहन चालकाशी होणा-या कायदेशीर कारवाई बाबत बोलणार नाहीत. अथवा तडजोड रकमेबाबत चर्चा करणार नाही |
| १५ | वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणा-या वाहनावर कारवाई करतांना ते उचलण्यापुर्वी त्याचे सोबतच्या कॅमेराने शुटींग किंवा फोटो काढणे बंधनकारक राहील. |

| | |
|---|---|
| १६ | दुचाकी वाहने उचलण्यापुर्वी पी.ए.सिस्टीमनी अलांउस करणे जरुरी आहे व पाच मिनीटानंतर सदरचे वाहन उचलण्यात यावे.दुचाकी वाहन उचलल्यानंतर अकोला शहर अंतर्गत वाहतुक शाखा किंवा ग्रामीण विभागातील संबंधीत पोलीस स्टेशनला वाहन नेले जाणार आहे त्या वाहतुक शाखेचा किंवा पोलीस स्टेशनचा उल्लेख वाहन उचललेल्या ठिकाणी खडुच्या साहायाने स्पष्ट दिसेल असा करणे आवश्यक राहील. अकोला शहर अंतर्गत मधील उचललेली वाहने शहर वाहतुक शाखा येथे व ग्रामीण विभागातील उचललेली वाहने संबंधीत पोलीस स्टेशन मध्ये जमा करावी लागेल. |
| १७ | वाहनावरील कर्मचा-यांनी गैरकृत्य केल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ करार रदद करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, अकोला यांनी राखुन ठेवले आहेत. |
| १८ | पिकअप व्हॅनमध्ये उचलण्यात येणा-या वाहनाकरीता पिकअप चार्जेस वसुल करण्याची जबाबदारी ही कंत्राटदाराची असेल. त्याकरीता पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून प्रमाणीत केलेले पावती पुस्तक शहर वाहतुक शाखा यांचे मार्फतीने संबंधित कंत्राटदाराना पुरविण्यात येईल. त्यावर करार करण्यात आलेल्या कर्तव्यार्थ असलेल्या वाहनाचा क्रमांक, नाव पत्ता व दुरध्वनी क्रमांक छापुन दिला जाईल. |
| १९ | वाहन दिलेल्या वेळेपेक्षा अर्ध्या तासापेक्षा जास्त विलंबाने कर्तव्यावर हजर झाल्यास त्याचा लेट मार्क लावावा तसेच वारंवार करणा-या वाहनाचा करार रदद करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.करार कालावधीमध्ये वारंवार विना परवाना विनाकारण गैरहजर राहणा-या वाहनाचा करार तात्काळ रदद करण्यात येईल. |
| २० | कायदेशिर कारवाई करतांना तसेच वाहन उचलतांना वाहनावरील कर्मचा-यांनी वाहनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच त्यांचे निष्काळजीपणामुळे एखादया वाहनाचे नुकसान झाल्यास त्याबददल संबंधित कंत्राटदार हे नुकसान भरपाई देतील. |
| २१ | पिकअप गाडीवर पि.ए.सिस्टीम लावण्यात येईल.वाहन पुरवठादार यांचे पोलीस खात्यातील अधिकारी कर्मचारी यांचेशी नाते संबंध असल्याचे निर्दशनास आल्यास करारनामा रदद करण्याचा अधिकार पोलीस अधीक्षक यांना राहील. |
| २२ | दरपत्रक धारकास प्रति वाहन दुचाकी /चारचाकी करिता अनाधिकृत पार्कीगमधुन गाडी उचलविण्याचे शुल्क म्हणुन अदा करण्यात येणा-या रकमेतुन दुचाकी चे व चारचाकी चे शुल्क मधुन **१५ टक्के रक्कम** प्रमाणे पोलीस निरीक्षक वाहतुक शाखा अकोला यांच्याकडे वाहतुक नियमाबाबत जनजागृती करीता स्वखुशीने देण्यात येईल असे संबंधीत वाहन पुरवठादारांना करारनामा मध्ये नमुद करावे लागेल. जमा होणारी रक्कम महिन्यातुन दोन वेळा संबंधित कंत्राटदार यांना अदा करण्यात येईल. |
| २३ | वाहन पुरवठादार यांचे पोलीस खात्यातील अधिकारी कर्मचारी यांचेशी नाते संबंध असल्याचे निर्दशनास आल्यास करारनामा रदद करण्याचा अधिकार पोलीस अधीक्षक यांना राहतील. |
| २४ | करारातील नमुद केलेल्या कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास रुपये ५०,०००/- इतक्या दंडास पात्र ठरेल व जमा असलेले शुल्काचे रक्कमेतुन सदरची वसुली करण्यात येईल. |
| २५ | सदर करार हा करार मंजुरी दिनांकापासुन फक्त १ वर्ष मुदतीचा असेल . या करारानुसार ५०० रुपयाचे मुद्रांकावर लिहुन देईल. |
| २६ | करारामध्ये वर नमुद केलेल्या अटी व शर्तीचा कोणत्याही प्रकारे भंग झाल्यास करार कायम ठेवण्याचा अगर रदद करण्याचा अगर कालानुरुप योग्य ते बदल करण्याचा अंतिम अधिकार पोलीस अधिक्षक अकोला यांना राहील |
| २७ | उतीर्ण दरपत्रक धारकास विहीत फॉर्म मध्ये करारनामा करावा लागेल व त्यांतील अटी व शर्ती पुरवठादारास बंधनकारक राहतील.सदरची सर्व कागदपत्रे तात्काळ या कार्यालयास सादर करावी |
| २८ | उत्तीर्ण कंत्राटदाराने करारनामा केल्यानंतर रुपये ६०००/- सुरक्षा ठेव रक्कम वाहतुक शाखेत जमा करावी. |
| २९ | काही कारणास्तव गाडी नादुरुस्त किंवा इतर कारणामुळे गाडी बदलविणे आवश्यक असल्यास सदरची गाडी बाबतचे कागदपत्राच्या अटी व शर्ती नविन गाडीसाठी सुध्दा सारख्याच राहतील. |
| ३० | तांत्रिक लिफाफामध्ये (नमुना ब) मध्ये वाहनाबाबतची सर्व कागदपत्रे व्यापारी लिफाफा (नमुना अ) मध्ये फक्त दर नमुद करावे दोन्ही लिफाफे ०१ मोठया लिफाफयामध्ये सिलबंद करुन दिनांक ३०.०५.२०२५ पर्यंत पोलीस अधीक्षक कार्यालयात सादर करावे त्यानंतर आलेला लिफाफा स्विकारण्यात येणार नाही. |
| ३१ | पुरविण्यात येणारी वाहने हि १० वर्षाचे आतील त्यांची निर्मीती असावी. |